आता सरकार देणार ड्रोन ला देखील अनुदान, केंद्र सरकारने महिला बचत गटांच्या ड्रोन योजनेसाठी १ हजार २६१ कोटी रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आलेली आहे. या योजनेतून महिलांना तथा महिला बचत गटांना ८ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येणार आहे. २ वर्षांच्या कालावधीमध्ये म्हणजे २०२४ ते २०२६ या कालावधीत देशातील १५ हजार महिला बचत गटांना या योजनेच्या माध्यमातून ड्रोन खरेदीसाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. राज्य ग्रामीण उपजीविका अभियान आणि खत कंपन्यांकडून पात्र महिला बचत गटांच्या सदस्यांची निवड करण्यात येणार आहे, त्यन्त्र निवडलेल्या सदस्यांना १५ दिवसांचे ड्रोन प्रशिक्षण घ्यावे लागेल. त्यामध्ये ५ दिवसांचे ड्रोन प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच १० दिवस कीटकनाशकांचे प्रशिक्षण देण्य्त येईल.राज्य ग्रामीण उपजीविका अभियान आणि खत कंपन्यांकडून ड्रोनची दुरुस्ती आणि यांत्रिक प्रशिक्षणाची आवड आवड असलेल्या सद्स्यांची निवड करण्यत येईल, तसेच त्यांना ड्रोन तंत्रज्ञ म्हणून प्रशिक्षित केले जाईल.आणि या योजनेंतर्गत महिला बचत गत शेतकर्यांना देखील भाडेतत्वावर ड्रोन उपलब्ध करून देतील.